# महत्वाची सूचना

आयुक्तालयाच्या दि. ३०.०७.२०२० नुसार प्रसिद्ध केलेल्या गट - ब (सामान्य राज्य सेवा व वैद्यकीय अधिकारी) संवर्गातील बदलीबाबतच्या सूचनांमध्ये पुढील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

१. यापूर्वी नमूद केलेला zoom app द्वारे घेण्यात येणारा सर्वसाधारण बदल्यांचा समुपदेशनाचा कार्यक्रम रद्द करण्यात येत आहे.

२. सध्याच्या COVID-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावाचा विचार करुन सन २०२० मधील सार्वत्रिक बदल्या १५ % च्या मर्यादेत करायच्या सामान्य प्रशासन विभागाच्या सूचना आहेत.

३. **सदर सूचना विचारात घेऊन ज्यांची सेवा सध्याच्या कार्यरत ठिकाणी ३ वर्षे पेक्षा जास्त झालेली आहे असे बदलीपात्र अधिकारी (गट - ब संवर्ग) जे निव्वळ रिक्त पदावर विंनती बदली घेऊ ईच्छीतात त्यांच्याच अर्जांचा विचार करण्यात येईल.**

४. अशा अधिका-यांना सूचित करण्यात येते कि, निव्वळ रिक्त पदी विनंती बदली हवी असल्यास आपण आपले अर्ज नव्याने आयुक्तालयाच्या aodesk2a@gmail.com या email वर तसेच संबंधित उपसंचालक कार्यालयाच्या email वर दि. ०६.०८.२०२० सायंकाळी ६.१५ पर्यंत सादर करावेत. सदर अर्जा सोबत आपल्या **सध्याच्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू अहवालाची प्रत जोडणे आवश्यक आहे,** त्यामुळे या पुर्वी आयुक्तालयास प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करता येणार नाही.

५. उपरोक्त नमूद मुदती नंतर प्राप्त emil अथवा टपाला द्वारे येणारे अर्ज विचारत घेतले जाणार नाहीत.

६. उपसंचालक कार्यालयाला सूचित करण्यात येते कि, दि. ५ व ६ रोजी निर्धारित वेळेत प्राप्त अर्जांची आपल्या स्तरावर छाननी करून अधिकां-यांच्या विनंती नुसार बदली प्रस्तावित करणे योग्य आहे किंवा प्रशासनाची निकड लक्षात घेऊन बदली करणे योग्य होणार नाही याबाबतचे स्पष्ट अभिप्राय नोंदवून यादी दि. ७.८.२०२० सकाळी ११.०० वाजे पर्यंत आयुक्तालयास aodesk2a@gmail.com या email वर सादर करावी.

७. उपसंचालक कार्यालयाला असेही सूचित करण्यात येते कि, उपरोक्त नमूद वेळेत आपले अभिप्राय प्राप्त न झाल्यास आयुक्त स्तरावरून प्रशासनाची निकड लक्षात घेऊन आवश्यकते नुसार विनंती बदली बाबतची कार्यवाही करण्यात येईल.

Scanned with CamScanner